# राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री सुधारणाविषयक विचार.

**प्रा. डॉ. एस. के. खडसे** राज्यशास्त्र विभाग प्रमुख कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूर, जिल्हा. सांगली.

**प्रा.डॉ.सुनिता बोर्डे खडसे** इतिहास विभाग प्रमुख श्रीमती सी.बी.शाह महिला महाविद्यालय, सांगली

---

**प्रस्तावना.**

गेल्या शेकडो वर्षांपासून भारतीय समाज व्यवस्था ही जातीव्यवस्थेवर आधारित असून भारतीय समाजव्यवस्थेत पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचा व मनुस्मृतीचा मोठ्या प्रमाणात प्रभाव दिसून येतो. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत चातुर्वर्ण पद्धतीमध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चार वर्ण आणि अतिशूद्र हा पाचवा वर्ण निर्माण केला होता. अतिशूद्र या वर्णाला भारतीय हिंदू समाजव्यवस्थेने अस्पृश्य ठरवले होते. अस्पृश्य समाजाला सर्व प्रकारच्या विकासापासून दूर ठेवून गावकुसाबाहेर ठेवले होते. अशाच प्रकारे स्त्रियांना देखील शूद्र मानून स्त्रियांच्या विरुद्ध अनेक प्रकारच्या अनिष्ट प्रथा परंपरा निर्माण केल्या गेल्या. ज्या माध्यमातून स्त्रियांचा कोणत्या प्रकारचा विकास होणार नाही याची काळजी मनुस्मृतीने आणि हिंदू समाज व्यवस्थेने घेतलेली दिसून येते. त्यामुळे शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांच्या विकासाची सर्व दारे मनुस्मृतीने बंद केली होती. स्त्रिया बुद्धिमान आहेत, त्यामुळे त्यांच्या बुद्धीचा विकास होऊ नये. स्त्रियांना शिक्षणाचा हक्क, समतेचा हक्क, न्यायाचा हक्क, संपत्तीचा हक्क आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क पूर्णपणे नाकारला होता.

त्यामुळे स्त्रियांवर मोठ्याप्रमाणात अन्याय-अत्याचार गेल्या हजारो वर्षांपासून झालेले होते. त्यांना सर्व प्रकारच्या सत्तेपासून पासून वंचित ठेवले होते. स्त्रियांनी बालपणात वडीलांवर, तरुणपणात नवऱ्यावर, आणि म्हातारपणात मुलांवर अवलंबून राहावे अशी परावलंबी स्त्री निर्माण करण्याचे नियम येथील मनुस्मृतीच्या माध्यमातून समाजव्यवस्थेने केले.या सर्व स्त्रिया त्यांच्या सर्वांगीण विकासापासून वंचित ठेवण्यासाठी सतीप्रथा, बहुपत्नी विवाह, जरठ कुमारी विवाह, बालविवाह, केशवपन, मुरुळी प्रथा, देवदासी प्रथा व भावई अशा अनेक प्रकारच्या अनिष्ट प्रथा परंपरेच्या माध्यमातून स्त्रियांवर मोठ्या प्रमाणात शारीरिक व मानसिक छळ करण्यात आले. भारतीय स्त्रियांच्या सुधारणेसाठी गौतम बुद्ध, सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, धोंडो केशव कर्वे, विठ्ठलरामजी शिंदे इत्यादी समाज सुधारकानी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत.

राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना हक्क, स्वातंत्र्य व न्याय्य देण्यासाठी तसेच त्यांचा कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक, जातीय छळ थांबवण्यासाठी विविध प्रकारचे नियम व कायदे करण्याचे कार्य आपल्या करवीर संस्थानामध्ये केले. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेला आणि मनुस्मृतीला फार मोठे आव्हान होते. भारतामध्ये सर्वप्रथम कायदेशीर मार्गाने स्त्रियांचा सर्वांगीण विकास शाहू महाराजांनी कशाप्रकारे केला याचा सविस्तर अभ्यास सदर संशोधन पेपर मध्ये केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

1.राजर्षी शाहू महाराजांच्या स्त्री सुधारणा विषयक विचारांचा अभ्यास करणे.

2. राजर्षी शाहू महाराज सुधारणेसाठी केलेल्या कायद्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके:-**

1.राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या विकासासाठी विविध स्वरूपाच्या योजना आखल्य व त्यांच्या विकासाला वाव दिला त्यामुळे स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा झाला.

2. .राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानांमध्ये विधवा पुनर्विवाह कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, स्त्री शिक्षणाचा कायदा, कौटुंबिक हिंसाचार कायदा अशा विविध कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांना सामाजिक न्याय आणि हक्क मिळवून दिले.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक व ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**तथ्य संकलन**:-

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी दुय्यम साधनाचा वापर केला असून यामध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्यावरील गौरव ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, मासिके, विविध दैनिक वृत्तपत्र आणि इंटरनेट इत्यादींचा वापर केला आहे.

**Key Words.**:-

1.**मनुस्मृती** :- हा ग्रंथ भारतामध्ये चातुर्वर्ण पद्धत निर्माण करणारा आणि भारतीय समाज व्यवस्थेमध्ये धार्मिक, जातीय, स्त्री-पुरुष, व शूद्रातिशूद्र अशा पद्धतीची विषमता निर्माण करणारा धर्मग्रंथ.

2.**भारतीय राज्यघटना** :- हा ग्रंथ भारतीय समाज व्यवस्थेतील चातुर्वर्ण्य पद्धत नष्ट करणारा तसेच भारतीय समाज व्यवस्थेतील धार्मिक, जातीय, सांस्कृतिक, स्त्री-पुरुष व शूद्रातिशूद्र अशा विविध प्रकारचे भेदभाव आणि विषमता नष्ट करून सामाजिक

समता प्रस्थापित करणारा आणि संपूर्ण देशातील नागरिकांना सामाजिक न्याय व मुलभूत हक्क प्रदान करणारा राष्ट्रीय ग्रंथ.

3. **सामाजिक न्याय** :- भारतामध्ये शूद्र अतिशूद्र, स्त्रिया यांना समाजामध्ये विषमतेच्या माध्यमातून झालेला अन्याय दूर करणारा आणि आणि सर्वांच्या विकासाला न्याय देणारा.

**राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री सुधारणा विषयक कार्य :-**

भारतीय हिंदू समाजव्यवस्थेत मनुस्मृतीचा पगडा मोठ्या प्रमाणावर होता त्यामुळे शूद्र अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्यावर मनुस्मृतीने खूप मोठ्या प्रमाणात बंधने टाकली, गुलामगिरी लादली. त्यामुळे या सर्व बहुजन समाजाला शूद्र अतिशूद्र आणि स्त्रियांना गुलामगिरीतून बाहेर काढून स्वाभिमानाने नवे जीवन देणाऱ्या तसेच त्यांना त्यांचे अधिकार व न्याय देणाऱ्या काही मोजक्या समाजसुधारकांमध्ये छत्रपती शाहू महाराजांचा समावेश होतो राजर्षी शाहू महाराज आणि इतर समाज सुधारक यांच्यात महत्त्वाचा फरक म्हणजे राजे शाहू महाराज यांच्याकडे राजसत्ता होती या राजसत्तेच्या आधारे समाजव्यवस्थेत विकासापासून वंचित असणाऱ्या शूद्र अतिशूद्र आणि स्त्रिया बहुजन समाजाच्या हिताचे त्यांच्या कल्याणाचे निर्णय घेऊ शकत होते. यासाठी त्यांना कोणत्याही ही दुसऱ्या व्यक्तीची मनधरणी करावी लागली नाही राजर्षी शाहू महाराज हे आपल्या प्रजेसाठी काम करणारे येथील अस्पृश्य बहुजन त्यांच्यासाठी काम करणारे समतेचे आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते समाज सुधारक व रयतेचे राजे होते. भारतीय हिंदू समाजव्यवस्थेत मनुस्मृतीने स्त्रियांवर विविध प्रकारचे बंधने लागून त्यांच्यावर अन्याय अत्याचार केले पुरुष प्रधान संस्कृतीने त्यांच्या विकासाची दारे बंद केली. त्यांना शिक्षणाचे, मालमत्तेचे, पुरुषांच्या बरोबरीने सर्व प्रकारचे माणूसपण अधिकार नाकारले गेले त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांनी यांच्या विकासासाठी आणि त्यांच्या प्रगतीसाठी आपल्या राज्यामध्ये विविध प्रकारचे कायदे केले. ते विविध प्रकारचे कायदे खालील प्रमाणे आहेत.

**1. विधवा पुनर्विवाह कायदा 1917 :-**

भारतीय हिंदू समाज व्यवस्थेमध्ये मनुस्मृतीने बालविवाह ही अनिष्ट प्रथा सुरू केली. परंतु या बालविवाह प्रथेमुळे अनेक मुली विधवा होत होत्या. त्यामुळे विधवांचे प्रश्न हिंदू समाज व्यवस्थेमध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाले होते. त्यामध्येच विधवा झालेल्या स्त्रियांना केशवपन करणे, सती जाणे इत्यादी अनिष्ट प्रथेनुसार जीवन जगावे लागत होते. 1901 च्या खानेसुमारीनुसार ब्राह्मण जातीतील 5 वर्षाखालच्या 15500 विधवा होत्या, तर 15 वर्षाखालील 3 लाख 25 हजार विधवा होत्या आणि 25 वर्षाखालील 25 लाख 40 हजार विधवा होत्या. यामुळे स्त्रीचे संपूर्ण जीवन विधवा म्हणून जगण हे अतिशय वाईट अवस्थेमध्ये होते त्यामुळेच राजश्री शाहू महाराज यांनी ही दाहकता बघून आपल्या संस्थानात 1917 मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा केला होता. याशिवाय शाहू महाराजांनी आपली सून इंदुमती यांचाही पुनर्विवाह लावून दिला त्यामुळे राजर्षी शाहू महाराज कायद्याची अंमलबजावणी आपल्या राजघराणे पासुनच केली.[1]

**2. आंतरजातीय विवाह कायदा 1919 :-**

भारतीय हिंदू समाजव्यवस्थेत मनुस्मृतीने विविध स्वरूपाची जातीव्यवस्था निर्माण केली या जातीव्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचे रोटीबेटी व्यवहार यावर बंदी घातली होती. त्यामुळे जाती मधेच किंवा पोटजाती मध्येच विवाह होत होते. परंतु वेगवेगळ्या जातीमध्ये कोणत्याही प्रकारच्या विवाहाला बंदी केली होती. अशा प्रकारचा एखादा विवाह झाला तर त्या घराला बहिष्कृत केले जात असे. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या काळात आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहाला कायदेशीर मान्यता दिली तसेच आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह आणि संतती याला कायदेशीर मान्यता दिली. या कायद्याचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही जाती धर्माचे 18 वर्षे पूर्ण असणाऱ्या मुला किंवा मुलीना आपला जोडीदार निवडण्यासाठी पालकांच्या परवानगीची गरज असणार नाही अशा पद्धतीची तरतूद या कायद्यामध्ये केली. यामुळे मुलींना आपल्या पसंतीस असलेल्या कोणत्याही जाती धर्मातील 18 वर्षावरील आपल्या जोडीदाराला निवडण्याचा अधिकार मिळाला. राजर्षी शाहू महाराज यांनी या आंतरजातीय विवाह कायद्याची अंमलबजावणी आपल्या स्वतःच्या राजघराना पासूनच केली. त्यांनी आपल्या बहिणीचा चंद्रप्रभाबाई या बहिणीचा विवाह धनगर घराण्यात यशवंतराव होळकर यांच्याशी करून दिला. खरतर संपूर्ण समाज व्यवस्थेवर मनुस्मृतीचा आणि हिंदू धर्माचा खूप मोठा पगडा त्या काळी होता. तरीही राजर्षी शाहू महाराजांचा हा निर्णय धर्माला आणि मनुस्मृतीला फार मोठ आव्हान होतं याचा त्रास राजश्री शाहू महाराजांना ब्राह्मणी व्यवस्थेकडून झालेला त्रास दिसून येतो. याशिवाय राजर्षी शाहू महाराजांनी तब्बल 100 धनगर-मराठा जातीमध्ये आंतरजातीय विवाह लावून दिले[2]. यामुळे एका बाजूला जाती निर्मूलनाची चळवळ करून दुसऱ्या बाजूला स्त्री मुक्तीची चळवळ सुद्धा सुरू केले केली.

**3. जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा.** 1920 :-

भारतीय समाज व्यवस्थेतील खालच्या शूद्रातिशूद्र व अस्पृश्य वर्गात असणाऱ्या स्त्री देवदासी, जोगतीन, मुरळी व भाविनी यांच्यासाठी 1920 मध्ये जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा राजर्षी शाहू महाराज यांनी केला आणि मनुस्मृतीने आणि हिंदू समाज व्यवस्थेने निर्माण केलेली ही स्त्रियांच्या गुलामगिरीची पद्धत किंवा प्रथा राजर्षी शाहू महाराजांनी कायदेशीर रित्या बंद केली[3].

**4. कौटुंबिक हिंसाचार कायदा 1919:-**

राजर्षी शाहू महाराज हे जाणते राजे होते, अभ्यासू राज्य होते. समाजातील तळागाळातील सर्व लोकांचा, स्त्रियांचा अभ्यास करणारे, त्यांना समाजातील सर्व लोकांच्या समस्या माहिती होत्या. त्यामुळे पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये मनुस्मृतीमुळे कुटुंबामध्ये स्त्रियांवर खूप मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार होत होता. राजर्षी शाहू महाराज यांनी 1920 मध्ये महिलांवरील क्रूर अत्याचार थांबवण्यासाठी त्यांचा मानसिक छळ आणि शारीरिक छळ आणि अत्याचार थांबवण्यासाठी तसेच स्त्रीला आपला जोडीदार निवडून न्याय समतावादी संसार उभा करण्यासाठी कौटुंबिक हिंसाचार कायदा म्हणजे स्त्रियांच्या छळवणुकीची प्रतिबंध करणारा कायदा 1920 मध्ये मंजूर केला. राजर्षी शाहू महाराज यांची फार मोठी दूरदृष्टी होती मात्र भारताला स्वातंत्र्य मिळून सुद्धा हा कायदा करायला 2005 हे वर्ष उजाडले. स्त्रियांचा मानसिक आणि कौटुंबिक छळ करता येणार नाही अशा प्रकारचा कायदा करून स्त्रियांच्या कौटुंबिक छळाला प्रतिबंध केला जर कोणी कुटुंबामध्ये स्त्रियांचा मानसिक कौटुंबिक छळ करत असेल तर त्यांच्याविरुद्ध कायदेशीर रित्या कार्यवाही करण्याची पद्धत राजर्षी शाहू महाराज या कायद्यामध्ये तरतूद केली होती[4].

**5. काडीमोड कायदा 1919:-**

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये मनुस्मृतीने विविध स्वरूपाच्या जाती निर्माण करून फुटीरता आणि विषमता निर्माण केली. विविध जाती निर्माण करू त्या जातीचे नियम तयार केले. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये जातपंचायत ही पुरुषाच्या हाती दिली गेली. जातपंचायतीवर त्या जातीतील पुरुषांचे वर्चस्व होते. त्यामुळे त्या जातीतील स्त्रीविरोधात एखादी घटना घडली असेल तर न्याय पुरुषांच्या बाजूने दिला जात होता. त्या स्त्रीला बहिष्कृत केले जात होते. त्या स्त्रीचा अतोनात छळ केला होता. अशा पद्धतीची न्यायव्यवस्था मनुस्मृति निर्माण केली होती. आजही काही जातीमध्ये जात पंचायती आहेत. त्या जातीतील स्त्रियांवर खूप मोठ्या प्रमाणात बंधने लादलेली आहेत. कोणत्याही स्त्रीला जातपंचायतीच्या विरोधात बोलण्याचा किंवा जात पंचायतच्या निर्णयाला विरोध करण्याचा अधिकार नव्हता. मात्र आजही सरकार जातपंचायत विरुद्ध फारशी कठोर कारवाई करताना दिसत नाही. या जातपंचायतीविरुद्ध आवाज उठविण्याचे कार्य डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी केले होते. मात्र या जात पंचायत आणि धर्मातील अंधश्रद्धा यांच्या विरुद्ध आवाज उठवला त्यामुळे दाभोळकर यांची हत्या केली. त्या काळात राजश्री शाहू महाराजांनी काडी मोड कायदा करून जात पंचायतीच्या लहरीवर न्यायदान व्यवस्थेवर चालणारी ही काडीमोड पद्धत बंद करून टाकली आणि प्रत्येक जातीतील स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार दिला आणि पुनर्विवाहाचा देखील अधिकार प्रधान केला[5].

**6. स्त्री शिक्षणाच्या सुविधा:-**

भारतामध्ये मनुस्मृतीने चातुर्वर्ण्य व्यवस्था निर्माण केली त्यामध्ये फक्त शिक्षणाचा अधिकार ब्राह्मण यांना प्रदान केला. मात्र शूद्र अतिशूद्र आणि स्त्रिया यांना शिक्षणाचे सर्व प्रकारचे अधिकार नाकारले. शूद्र अतिशूद्र आणि स्त्रिया शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे त्यांचा विकास गेल्या हजारो वर्षापासून झाला नाही. राजर्षी शाहू महाराज यांनी शूद्र अतिशूद्र, पुरुष आणि स्त्रिया शिकून शहाणे झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र्य, अज्ञान आणि अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत हे ओळखले होते. त्यामुळे राजर्षी शाहू महाराज यांनी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार आपल्या संस्थानात सर्व जाती-धर्माच्या स्त्रियांना व पुरुषांना मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. आपल्या संस्थानांमध्ये प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केल्या. आणि प्राथमिक शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतूद केली.[6] राजश्री शाहू महाराजांना महात्मा फुले यांच्याकडून स्त्री शिक्षणाची प्रेरणा मिळाली. त्यामुळे त्यांच्या राज्यकारभारात एक महत्त्वाचा भाग स्त्री शिक्षण. आपल्या राज्याच्या उत्पन्नातून त्या काळात दरवर्षी एक लाख रूपये खर्च करत होते, पुढे हा खर्च तीन लाखावर राजर्षी शाहू महाराजांनी करायला सुरुवात केली. शाहू महाराज यांनी ग्रामीण भागातील मुलींसाठी शाळा काढल्या. ज्या ग्रामीण भागात खेड्यात स्वतंत्र मुलींसाठी शाळा नाहीत अशा ठिकाणी मुलींनी शाळेत मुलांच्या बरोबरीने एकत्रित शिक्षण घ्यावे म्हणून त्यांना प्रोत्साहन दिले. त्याने चांभार आणि ढोर जातीतील मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढून त्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले केली. मुलींच्या शिक्षणात शिक्षकाने अधिक रस घ्यावा म्हणून मुलांच्या शाळेत पास होणाऱ्या मुलींचा संख्येवर त्या शिक्षकांना बक्षिसे व बढती देण्याची अभिनव महत्वकांक्षी योजना राजर्षी शाहू महाराजांनी राबवली. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थांमधील मुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय करून देण्यासाठी शाळा सुरू केल्या, तसेच या स्त्रियांना उच्च शिक्षण देण्यासाठी त्याने विशेष तरतुदी केल्या व त्यांना शिष्यवृत्ती सुरू केल्या, अत्रिकाबाई डॅनियल बेकर या ख्रिश्चन मुलीला उच्च शिक्षणासाठी पुण्याला पाठविले, राधाबाई सूर्यवंशी आणि ताराबाई खानोलकर यांच्यासह पाच मुलींना त्यांनी उच्च शिक्षणासाठी मुंबईला पाठवले तर कृष्णाबाई केळवकर यांना मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये पाठवून त्यांना डॉक्टर बनवले. पुढे याच कृष्णाबाईंना शाहू महाराजांनी उच्च वैद्यकीय अभ्यासासाठी इंग्लंडला पाठवले या सर्व बाबींचा त्या काळातील अभ्यास केल्यास राजर्षी शाहू महाराज हे स्त्रियांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि त्यांना उच्च शिक्षण तसेच परदेशी शिक्षण मिळाले पाहिजेत यासाठी किती प्रयत्नशील होते हे आपल्याला दिसून येते[7].

**7.प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाची सुविधा:-**

ज्या स्त्रियांना बालपणी शिक्षण मिळाले नाही, ज्यांचे विवाह झालेले आहेत. अशा गरजु स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत राजर्षी शाहू महाराज यांनी 1919 मध्ये आपल्या राज्यामध्ये खास आदेश काढला. राजर्षी शाहू महाराज यांनी आदेशात असे म्हटले की मागासलेल्या जातीतील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या प्रौढ स्त्रियांच्या राहण्या-जेवण्याची सर्व व्यवस्था राजदरबाराकडून मोफत केली जाईल. हुशार मुलींनी पुढील शिक्षण घ्यावे यासाठी महाराजांनी शिष्यवृत्ती सुरू केल्या. आपली कन्या अक्कासाहेब महाराजांच्या विवाहानिमित्त त्यांनी चौथीच्या वार्षिक परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थीनीसाठी प्रत्येकी चाळीस रुपयाच्या पाच शिष्यवृत्या सुरू केल्या. शाहू महाराज यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर गुजरातमधील मुलींसाठी शिष्यवृत्या सुरू केल्या[8].

**समारोप व निष्कर्ष:-**

राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या राज्यामध्ये स्त्री-पुरुषांमध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी तसेच दलित उपेक्षित शूद्रातिशूद्र या सर्व लोकांमधील आर्थिक व सामाजिक विषमता कमी करण्यासाठी व त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी अनेक प्रकारचे कायदे केले. राजर्षी शाहू महाराज हा पहिला राजा आहे की ज्यांनी दलित, पीडित, स्त्रिया, उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. ही प्रेरणा म. ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होती. बाबासाहेब आंबेडकरांचा माणगावच्या परिषदेमध्ये दलितांचा नेता व भारतीय अग्रणी नेता म्हणून घोषित केले. यापुढील काळामध्ये डॉ.बाबासाहेबांनी दलित उपेक्षित समाजाचे नेतृत्व करावे असे आवाहनही त्यांनी केले[9]. आपल्या आपल्या राज्यामध्ये उपेक्षित समाजातील व अस्पृश्य वर्गातील लोकांना 50 टक्के आरक्षण दिले. त्यामुळेच आरक्षणाचे जनक व सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समतानिर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे सामाजिक न्यायाचे जनक असेही त्यांना म्हटले जाते. खर तर या संपूर्ण राजकीय कार्याबरोबर व सामाजिक कार्याबरोबरच त्यांनी स्त्री सुधारणेचे कार्य हाती घेतले. राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या उत्थानासाठी व प्रगतीसाठी जे जे काही करता येईल तेथे करण्याचे प्रयत्न कायद्याच्या चौकटीत केलेला आपल्याला दिसून येतो. राजर्षी शाहू महाराजांनी विधवा पुनर्विवाह कायदा, जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा समाजातील या अनिष्ट प्रथा विरुद्ध कायदा करून जोगत्या-मुरळी भाविनी यांनाही स्त्रिया सारखी माणसं मानेने जगण्याचा अधिकार प्रदान करण्याची कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले तसेच जात पंचायतीची स्त्रियांवरील मक्तेदारी नष्ट करण्यासाठी काडीमोड अंतर जाति विवाह करून अनेक आंतरजातीय विवाह कायदेशीर त्या लावून दिले सर्व जाती धर्मातील स्त्रियांना व मुलींना मोफत शिक्षणाची प्राथमिक शिक्षणाचे माध्यमिक शिक्षणाची उच्च शिक्षणाची व परदेशी शिक्षणाची संधी उपलब्ध करून त्यांना शिष्यवृत्ती दिली10. हिंदू समाज व्यवस्थेमध्ये कुटुंबात कोणत्याही स्त्रीचा शारीरिक व मानसिक छळ होऊ नये, स्त्रीला संरक्षण देण्यासाठी कायदा त्यांनी केला. अशाप्रकारे अनेक कायदे करून स्त्रियांच्या विकासाला राजर्षी शाहू महाराजांनी त्या काळी हातभार लावलेला दिसतो त्याचा अर्थ विकास झाल्याशिवाय म्हणजे स्त्रियांना शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाही स्त्रियांचा विकास झाल्याशिवाय कुटुंबाचा किंबहुना देशाचा विकास होणार नाही राजर्षी शाहू महाराज यांनी ओळखले होते. त्यामुळे राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या सुधारणेसाठी आपल्या राज्यात मध्ये खर्चाची तरतूद केली, स्त्री उद्धारासाठी प्रयत्न केले असा स्त्रीवादी विचारवंत समाज सुधारक राजर्षी शाहू महाराज होऊन गेले.

**संदर्भ ग्रंथ सूची.**

1. डॉ.पवार मंजुश्री, राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री विषयक कार्य हे योद्धा सुधारकांचे, दैनिक गंधवार्ता ऑनलाइन वृत्तपत्र.

2. विकिपीडिया.

3 मराठी विश्वकोश लेखक जयसिंगराव पवार..

4.विकासपिडिया.

5.डॉ.पवार मंजुश्री-राजर्षी शाहू महाराज आणि स्त्री, शिक्षण मराठा सेवा संघ, सत्यशोधक डॉट कॉम.

6. विकासपिडिया

7.डॉ.पवार मंजुश्री, राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री विषयक कार्य हे योद्धा सुधारकांचे, दैनिक गंधवार्ता ऑनलाइन वृत्तपत्र.

8. डॉ.पवार मंजुश्री-राजर्षी शाहू महाराज आणि स्त्री, शिक्षण मराठा सेवा संघ, सत्यशोधक डॉट कॉम.

9.प्रा. साळुंके नानासाहेब- शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर.

10.डॉ.सुनीता खडसे, डॉ. संतोष खडसे- ऐतिहासिक परिप्रेक्षातील स्त्रिया, शुभम प्रकाशन पुणे.